# अमरावती महानगरपालिका अमरावती

## महिला व बाल विकास विभाग

**कोटेशन नोटीस**

जा क्र- अमनपा/मबावि/ 214 / 2025 दिनांक 05/ 12 /2025

महिला व बालविकास विभाग, महानगरपालिका अमरावती अंतर्गत खालील प्रमाणे कार्य करावयाचे आहे. तरी ज्यांना काम करावयाचे असेल त्यांनी आपआपले सीलबंद कोटेशन महिला व बालविकास अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक 11 / 12 /2025 रोजी दुपारी 12 वाजेपर्यंत आणुन द्यावे. मुदतीनंतर आलेले दरपत्रक स्वीकारण्यात येणार नाही.

| योजना | कामाचे नाव | खर्चाचा अंदाज |
|---|---|---|
| 1 | महानगरपालिका अंतर्गत मुली व युवतींकरीता वाहक (कंडक्टर ) प्रशिक्षण राबविणे. | प्रती प्रशिक्षणार्थी सर्व खर्चासह दर सादर करावे . |

**दरपत्रकासोबत जोडावयाचे आवश्यक कागदपत्र :-**

1. RTO कार्यालयामध्ये वाहक / चालक प्रशिक्षण संस्था म्हणुन नोंदणी प्रमाणपत्र
2. GST प्रमाणपत्र (लागु नसल्यास तसे पत्र )
3. दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक ( Shop – Act License)
4. संस्था / फर्मकडील वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र (लागु असल्यास ).
5. संस्थेचे / संस्थाचालकाचे पॅन कार्ड .
6. संस्थाचालकाचे आधार कार्ड.
7. प्रशिक्षणासंबंधी आवश्यक यंत्रसामुग्री व प्रशिक्षीत प्रशिक्षक असल्याचा पुरावा .(यादी जोडणे आवश्यक)

**अटी व शर्ती :-**

1. प्रती प्रशिक्षणार्थी सर्व खर्चासह दर सादर करावे दरांमध्ये सर्व कर व खर्चाचा समावेश असावा.
2. वरील योजना करीता दरपत्रक ( वाहक प्रशिक्षण करीता दर ) सादर करावे.
3. सदर प्रशिक्षण करीता प्रशिक्षण देण्यासाठी केवळ अमरावती महागनरपालिका क्षेत्रातील संबंधीत शासनमान्य संस्थांनीच दरपत्रक सादर करावे .
4. वाहक प्रशिक्षण करीता करीता सदर योजना प्रस्तावीत आहे. त्यानुसार लाभार्थी संख्या कमी वा जास्त करण्याचा सर्वाधिकार मनपाला असेल. त्यानुसार कार्य करावे लागेल.

5. प्रशिक्षणार्थी महिला असल्याने सुरक्षेची सर्व जबाबदारी दरपत्रक सादरकर्ते यांची राहील. त्यास मनपा जबाबदार नसेल.
6. प्रशिक्षण योजनेत सराव , थेअरी , शासनमान्य वाहक परवाना या बाबी पुर्ण करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची असेल.
7. प्रशिक्षणार्थी यादी मनपा कडुन देण्यात येईल. त्यानुसार प्रशिक्षण सस्थेस राबवावे लागेल. व प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर विधीग्राहय प्रमाणपत्र / परवाना देणे आवश्यक राहील.
8. मनपा कडुन देण्यात आलेल्या नमुन्यात अहवाल व आवश्यक बाबी सादर केल्यानंतरच देयक मंजुरीची कार्यवाही सुरु करण्यात येईल.
9. दरपत्रक मंजुर झाल्यास नियमानुसार मुद्रांकावर करारनामा तसेच सुरक्षा रक्कम ( कामाच्या 2 टक्के) कार्यालयास सादर करावी लागेल.
10. सदर कार्य मनपा स्वनिधीतुन प्रस्तावीत असुन देयक अदा होण्यास विलंब झाल्यास त्यावर व्याज मिळणार नाही.
11. एक वा अधिक दरपत्रक स्वीकारणे , सर्व दरपत्रक नाकारणे, अटी /शर्तीमध्ये बदल करणे याबाबत कोणतीही सुचना न देता करण्याचे सर्व अधिकार महानगरपालिकेस असेल.
12. शक्य झाल्यास प्राप्त कोटेशन दिनांक 11 /12/2025 रोजी उघडण्यात येईल.
13. अधिक माहिती तसेच सविस्तर अटी / शर्तीकरीता महिला व बालविकास विभाग येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

~~14.~~

दिनांक :- 5 / 12/2025

महिला व बालविकास अधिकारी
महानगरपालिका अमरावती

उपायुक्त (02)
महानगरपालिका अमरावती